# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. वर्षा पाटील

---

सप्त सुरांच्या नादातूनी
साकारले संगीत
 ऊँकाराच्या ध्वनी तूनी
प्रकटले ब्रम्ह गीत
सरस्वतीच्या विणेतून
झंकारल्या नाना ताना
मंत्रमुग्ध केले तिने
आम्हा साऱ्या जना
मन करी रे प्रसन्न
संगीताचे स्वरबंध
माझे जीवन गाणे
करी संगीत तराणे
नृत्य नाच आणि गाणे
यांचे त्रिवेणी संगम म्हणजे
संगीत सजले अंगी लेवूनी
नाना राग अन धून
सुरांची किमया अशी
की जाती सारे रोग पळून
संगीत म्हणजे झुळझुळ पाणी
संगीत म्हणजे मोहक गाणी
संगीत म्हणजे गोड वाणी
संगीत म्हणजे थंड वारा
संगीत म्हणजे श्रावणधारा
शब्दसूरांचा मेळ गुंफूनी
सजले संगीत साज लेवूनी
मोहविती सुरांच्या ताना
धुंद करी स्वर हे मना
स्वानंदातून देई आनंद
संगीत रसिकजना

Anahat Music Therapy